# राज्य आरोग्य व कुटुंब कल्याण संस्था, नागपूर
## माता कचेरी परिसर, श्रध्दानंदपेठ, दीक्षाभूमीजवळ, नागपूर.४४००२२
## (प्रत्यक्ष मुलाखत - WALK INTERVIEW)

राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत राज्य आरोग्य व कुटुंब कल्याण संस्था नागपुर मार्फत खालील कंत्राटी पदे भरावयाची आहे पदाकरीता सविस्तर पद निहाय माहिती www.arogya.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर टाकण्यात आलेली आहे.

| अ. क्रं. | पदाचे नांव | पदस्थापनेचे ठिकाण | प्रवर्ग निहाय पदसंख्या | शैक्षणिक अर्हता | वय मर्यादा | मानधान (प्रति माह) |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | वैद्यकिय अधिकारी | राज्य आरोग्य व कुटुंब कल्याण संस्था,नागपूर. | खुला- १ पद | एम.बि.बि.एस. (उच्च शैक्षणिक पात्रतेस प्राधान्य दिले जाईल) | ३८ वर्ष व सेवानिवृत्त वैद्यकिय अधिकाऱ्यास ६१ वर्ष कमाल मर्यादा | रुपये - ६०,००० |
| २ | न्युट्रीशनऑफिसर (पोषाहार तज्ञ) (पोषाहार विभाग-नागपूर करीता) | राज्य आरोग्य व कुटुंब कल्याण संस्था,नागपूर. | खुला- १ पद | (BSC Home Science, पदव्युततर पदवी व MS-CIT पोषाहार विभागाचा कामाचा अनुभव असलेल्यांना प्राधान्य | ३८ वर्ष | रुपये - २०,००० |
| ३ | वसतीगृह व्यवस्थापक | राज्य आरोग्य व कुटुंब कल्याण संस्था,नागपूर. | अ.जा. - १ पद | Degree/Diploma in Hotel Management/ MBA, व MS-CIT Candidate with Experience of Hotel/Hostel Management Should be given preference | ४३ वर्ष | रुपये - २०,००० |
| ४ | PHN | राज्य आरोग्य व कुटुंब कल्याण संस्था,नागपूर. | खुला - १ | PHN/BSc (नर्सीग) शाखेतील पदवी किंवा पदविका व MS-CIT आवश्यक प्रशिक्षणाचा अनुभव असल्यास प्राधान्य. | ३८ वर्ष | रुपये - २०,००० |
| ५ | संख्यिकी अन्वेषक | राज्य आरोग्य व कुटुंब कल्याण संस्था,नागपूर. | खुला - १ | 1) Graduate in Statistic 2) MS-CIT 3) Marathi Typing 30 wpm 4) English Typing 40wpm 5) NHM Experience Preferable | ३८ वर्ष | रुपये - १८,००० |

**सर्वसाधारण अटी व शर्ती**

१. अ.क्र.१ या पदाकरीता सार्वजनिक आरोग्य विभागातील सेवानिवृत्त वैद्यकिय अधिकारी यांना देखील अर्ज करता येईल. राष्ट्रिय आरोग्य अभियान अंतर्गत वैद्यकिय अधिकारी (MBBS), विषेशज्ञ, अतिविशेषतज्ञ पदावरील उमेदवारांची नेमणुकीकरीता कमाल वयोमर्यादा ६१ वर्ष व समाप्ती वयोमर्यादा ७० वर्ष राहील सदर पदाची नेमणूक ही कंत्राटी पध्दतीने असल्यामुळे त्यांना शासकीय कर्मचारी म्हणून गणले जाणार नाही.

२. खुल्या प्रवर्गा करीता कमाल ३८ वर्ष व राखीव प्रवर्गाकरीता वयोमर्यादा कमाल ४३ वर्ष राहील.

३. करार पध्दतीने नेमणूक करावयाच्या असल्याने एकत्रित मानधना शिवाय अन्य कोणत्याही आर्थिक तरतुदी लागू राहणार नाही. पदसंख्या, शैक्षणिक अर्हता, मुलाखतीची पध्दत व पदभरतीची प्रक्रिया या मध्ये आवश्यक्तेनुसार बदल करण्याचे सर्व अधिकार निवडसमितीला असतील.

४. अर्जदार हा महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असल्याचे शासनाने अधिकृत केलेल्या सक्षम अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र सादर करावे. तसेच अ.क्र. १ या पदाकरीता सार्वजनिक आरोग्य विभागातील सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी यांचेकरीता जिल्हा शल्य चिकित्सक यांची वैद्यकिय रित्या सक्षम असलेले प्रमाणपत्र सादर करावे.

५. अर्जदार हा संबधित पदासाठी शारीरीक व मानसीक दृष्टया सक्षम असावा तसेच अर्जदारा विरुध्द कोणतेही फौजदारी गुन्हा दाखल झालेला नसावा.

६. अर्ज करणाऱ्या उमेदवारांनी त्याचे वय, पत्ता, भ्रमणध्वनी क्रमांक, ई-मेल आयडी, शैक्षणिक अर्हता, सक्षम प्राधीकाऱ्याने निर्गमित केलेले जातीचे प्रमाणपत्र शासकीय कार्यालयात काम केल्याचे अनुभवाचे प्रमाणपत्र, सार्वजनिक आरोग्य विभागात सेवा केल्याचा पुरावा दाखल कागदपत्र त्याबाबतचा कागदपत्राच्या छायांकित प्रति साक्षांकित करुन व मूळ कागदपत्रे/प्रमाणपत्र व फोटा घेऊन मुलाखतीस उपस्थित राहावे.

७. इच्छुक व अर्हताप्राप्त उमेदवाराने (जाहिरातीत दिलेल्या अर्जाच्या नमुण्यासह) आपले अर्ज व लिफाफयावर पदांचे नाव लिहावे. सदर अर्ज दिनांक १०.०३.२०२२ पर्यंत कार्यालयीन वेळेत (सकाळी १० ते साय. ५.०० वाजेपर्यंत) **संचालक, राज्य आरोग्य व कुटुंब कल्याण संस्थ, माताकचेरी परिसर, श्रध्दानंदपेठ, नागपूर** या पत्त्यावर पोहचतील अशा बेताने पाठवावे किंवा स्वहस्ते पोहोचते करावे. विहित कालमर्यादे नंतर प्राप्त अर्जाचा विचार केला जाणार नाही.

८. अपूर्ण भरलेले तसेच वय, शैक्षणिक अर्हता, गुणपत्रिका,अनुभव, सक्षम प्राधीकाऱ्याने निर्गमित केलेले जातीचे प्रमाणपत्र इत्यादी संदर्भातील स्वसाक्षांकित प्रति न जोडलेले अर्ज अपात्र समजण्यात येईल आणि अशा अपात्र ठरलेल्या अर्जाबाबत कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही.

९. कोणताही अर्ज अथवा सर्व अर्ज स्वीकारण्याबाबत/नाकारण्याबाबतचे तसेच पदाचे संख्येत फेरबदल करण्याचे किंवा सदर जाहिरात रदद् करण्याचे सर्व अधिकार निवड समिती, यांनी राखून ठेवलेले आहेत.

१०. मुलाखतीस पात्र/अपात्र उमेदवारांची यादी दिनांक १४/०३/२०२२ रोजी या कार्यालयाचे सुचना फलकावर लावण्यात येईल. याबाबत कुठलाही स्वतंत्र पत्रव्यवहार उमेदवारांसोबत केला जाणर नाही.

११. यादीबाबत लेखी आक्षेप नोंदी दि. १५/०३/२०२२ पर्यंत कार्यालयीन वेळेत संचालक,राज्य आरोग्य व कुटुंब कल्याण संस्था,नागपूर येथे लेखी स्वरुपात उमेदवाराने सादर करावे.

१२. आक्षेप पडताळणी नंतर शैक्षणिक अहर्ता निकषाप्रमाणे Shortlist तयार करण्यात येईल व त्यानुसार दि. १७/०३/२०२२ रोजी मुलाखतीस पात्र/अपात्र उमेदवारांची अंतिम यादी संचालक, राज्य आरोग्य व कुटुंब कल्याण संस्था,नागपूर येथे सुचना फलकावर लावण्यात येईल.याबाबत कुठलाही स्वतंत्र पत्रव्यवहार उमेदवारांसोबत केला जाणर नाही.

१३. मुलाखत दिनांक २२.०३.२०२२ रोजी सकाळी १०.३० वाजता राज्य आरोग्य व कुटुंब कल्याण संस्था,**माता कचेरी परिसर, श्रध्दानंदपेठ, दीक्षाभूमीजवळ, नागपूर.४४००२२ येथे ठेवण्यात** आलेली असुन दिनांकामध्ये बदल करण्याचे अधिकार अध्यक्ष तथा संचालक, राज्य आरोग्य व कुटुंब कल्याण संस्था,नागपूर यांनी राखुन ठेवलेले आहे.

१४. उमेदवारांची मौखिक परीक्षेला नियोजित स्थळी येण्या-जाण्याकरीता प्रवास खर्च वा इतर खर्च दिला जाणार नाही.

१५. शासकीय सेवेतुन सेवानिवृत्त झालेल्या अधिकारी/कर्मचाऱ्याचे मानधन त्यास सेवानिवृत्तीच्या वेळी मिळणारे **अंतिम वेतन** वजा सध्याचे निवृत्ती वेतन च्या आधारे गणना करुन ठरविण्यात येईल.(शासन निर्णय क्रमांक संकिर्ण - २७१५/ प्र. क्रं.१००/१३ दिनांक १७.१२.२०१६ नुसार)

१६. सदर नियुक्ती ही प्रथमतः दि.२९.०६.२०२२ पर्यंत असेल व आवश्यकतेनुसार पदाला मुदतवाढ देण्याविषयी विचार केला जाईल.

वरील पदांकरीता मुलाखत दिनांक तसेच आवश्क्ष्यक शैक्षणिक पात्रता, अनुभव, ई. बाबत सविस्तर जाहीरात व माहिती www.arogya.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

| अर्ज सादर करण्याचा दिनांक | पात्र, अपात्र उमेदवारांची यादी | आक्षेप सादर करण्याचे अंतिम दिनांक | पुर्व गुणवत्ता यादी दिनांक | मुलाखत दिनांक |
|---|---|---|---|---|
| दिनांक १०.०३.२०२२ पर्यंत कार्यालयीन वेळेत (सकाळी १० ते साय. ५.०० वाजेपर्यंत) (शासकिय सुटट्ीचे दिवस वगळुन) | दिनांक १४/०३/२०२२ (साय. ५.०० वाजेपर्यंत) | दि. १५/०३/२०२२ (साय. ५.०० वाजेपर्यंत) | दि. १७/०३/२०२२ (साय. ५.०० वाजेपर्यंत) | दिनांक २२.०३.२०२२ रोजी सकाळी १०.३० |

(signature)

**संचालक, राज्य आरोग्य व कुटुंब कल्याण संस्था,नागपूर माताकचेरी परिसर, श्रध्दानंदपेठ, नागपूर**

**राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत संचालक,राज्य आरोग्य व कुटुंब कल्याण संस्था,नागपूर येथील कंत्राटी पदभरती.**

**अर्जाचा नमुना.**

__________________ या पदासाठी अर्ज.

प्रति,

मा.अध्यक्ष तथा संचालक
**राज्य आरोग्य व कुटुंब कल्याण संस्था,नागपूर.**

१) उमेदवाराचे संपूर्ण नाव :-
मराठी मध्ये (संपूर्ण नाव) :- ______________________________

इंग्रजी मध्ये (संपूर्ण नाव) :- ______________________________

२) उमेदवाराचा संपूर्ण पत्ता :- ______________________________

______________________________

पिन कोड ________

३) दुरध्वनी/मोबाईल क्रमांक ________________ ईमेल आयडी ______________

४) जन्म तारीख :- __________दि. / /२०२२ रोजीचे वय — वर्ष— महिने—

५) जातीचा प्रवर्ग :- ______________ पोट जात ________

६) कोणत्या प्रवर्गासाठी अर्ज केलेला आहे :- ____

७) शैक्षणिक अर्हता :-

| अ.क्रं. | परिक्षेचे नाव | विद्यापिठ / मंडळाचे नाव | उत्तीर्ण वर्ष | एकूण गुण | प्राप्त गुण | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |

( पदाच्या शैक्षणिक अर्हते नुसार व उच्च शैक्षणिक अर्हतेनुसार सर्व गुणपत्रक/प्रमाणपत्राच्या छायांकित प्रत सोबत जोडणे आवश्यक )

८) अनुभव :-

| अ. क्र.. | संस्थेचे नाव व पत्ता | पदाचे नाव | शासकिय/निमशासकिय | कालावधी. | | एकूण वर्ष. |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | पासुन | पर्यंत | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |

(अनुभव प्रमाणपत्र सोबत जोडणे आवश्यक)

९) जाहिरातीमधील पदाच्या शैक्षणिक अर्हतेनुसार (आवश्यक्तेनुसार लागु असल्यास) :-

| Course Name | Yes | No |
|---|---|---|
| टायपींग ( इग्रजी ४० WPM) | | |
| टायपींग ( मराठी ३० WPM) | | |
| MSCIT | | |
| Tally ERP-9 | | |

( प्रमाणपत्रच्या छायांकित प्रत सोबत जोडणे आवश्यक)

१०) अर्जासोबत खालील (छायांकित) प्रती जोडण्यात आलेल्या आहे :-

(१) ______________________________

(२) ______________________________

(३) ______________________________

(४) ______________________________

(५) ______________________________

उपरोक्त प्रमाणे मी असे प्रमाणित करतो / करते की, वर नमूद केलेली माहिती हि खरी असुन,ती खोटी आढळल्यास माझी उमेदवारी नियुक्तिच्या कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल याची मला जाणीव आहे.

उमेदवाराची स्वाक्षरी.

नाव :- ______________________